सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

संदर्भ क्र.: विविमं/२०२४–२५/१०६६ **अतितात्काळ व कालमर्यादेचे** दिनांक : १८/०२/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

विषय : ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीचा अहवाल पाठविणेबाबत.
संदर्भ क्र.: ससं/उशि/पुवि/संकिर्ण/परिपत्रक १३२५५८६/२०२५/७३९, दि. १७.०२.२०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या संदर्भ क्र. विकमं/२०१६–१७/८२२, दिनांक १४/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विभागांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदभीर्य विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सादर करावयाचा आहे, यास्तव आपल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ परिसरातील विभागात ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यार्थी विकास मंडळाच्या (www.unipune.ac.in – BOD Online – Login - Username – Password - students development - menu – gov joint scheme proposal – other joint scheme proposal – Add new – योजना निवडा – ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० अंमलबजावणी अहवाल) या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने तात्काळ भरण्यात यावा.

सदर अहवाल शासनास सादर करावयाचा असल्याने आपला अहवाल तात्काळ उपरोक्त लिंकवर भरण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे, हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
Web-www.jdhepune.info E-mail: jdhepune@gmail.com
फोन नं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्स नं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.सासं/उशि/पुवि/संकिर्ण/परिपत्रक१३२५५८६/२०२५/ 739 दि. १७.०२.२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे
२. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
३. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, पुण
४. कुलसचिव, गोखले इनस्टीटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे
५. कुलसचिव, भारती विद्यापीठ, पुणे
६. कुलसचिव, विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे
७. कुलसचिव, श्री. बालाजी विद्यापीठ, पुणे
८. कुलसचिव, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे
९. कुलसचिव, डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्डपिस युनिर्व्हसिटी, पुणे

**विषय: अवमान याचिका क्र.३९०/२०१८ श्री. संतोष श्रीकृष्ण पाचलाग वि. महाराष्ट्र शासन (जनहित याचिका क्र.१७३/२०१०, डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भः- १. शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र - २२१२/(प्र. क्र. १३१/२०१६) समन्वय,दि.२१.१०.२०१६
२. संचालनालयाचे पत्र क्र उशिसं/ २०१६/ ध्वनी प्रदूषण/ मवि- १/१२४०१ दि.२८.१०.२०१६
३. शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०२५/प्र.क्र ०७/२०२५/समन्वय दि.१२.०२.२०२५
४. शासन पत्र क्र. न्यायाप्र -२०२५/ प्र.क्र.०७/२०२५/समन्वय दि.१४.०२.२०२५
५. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/धवनी प्रद्षण/ मवि-१/२०२५/ईऑफीस- १३२५५८६ दि.१७.०२.२०२५

उपरोक्त विषयी संदर्भिय शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१६ मधील दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबतसंचालनालयाचे पत्र दि.२८.१०.२०१६ अन्वये कळविण्यात आले होते. (प्रत संलग्न) तथापि विषयांकित प्रकरणी आपल्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास अदयापही अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आहवाल शासनास दि.१८.०२.२०२५ पूर्वी सादर करावयाचा असल्याने सदरहू अहवाल आजच उलट टपाली संचालनालयास सादर करावे असे नमूद केले आहे.

त्यानुसार या विभागातील सर्व अकृषी/अभिमत/स्वायत्त विद्यापीठांना या पत्रान्वये कळविण्यात येते की, या विभागातील विद्यापीठांचा व विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन या कार्यालयाच्या jdhepune@gmail.com ईमेल आयडी उद्या दि. १८.०२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तात्काळ सादर करावा.

**सोबत : वरीलप्रमाणे**

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे-१

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/ध्वनी प्रदूषण/मवि-१/२०२५/ ई ऑफीस- १३२५५८६ दि.१७.०२.२०२५

**स्मरणपत्र -१**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

विषय:- अवमान याचिका क्र.३९०/२०१८ श्री. संतोष श्रीकृष्ण पाचलाग वि. महाराष्ट्र शासन (जनहित याचिका क्र.१७३/२०१०, डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम,२००० च्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ:- १. शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र- २२१२/(प्र.क्र.१३१/२०१६) समन्वय,दि.२१.१०.२०१६
२. संचालनालयाचे पत्र क्र उशिसं/२०१६/ध्वनी प्रदूषण/मवि-१/१२४०१ दि.२८.१०.२०१६
३. शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०२५/प्र.क्र.०७/२०२५/समन्वय दि.१२.०२.२०२५
४. शासन पत्र क्र. न्यायाप्र-२०२५/प्र.क्र.०७/२०२५/समन्वय दि.१४.०२.२०२५

उपरोक्त विषयी संदर्भिय शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१६ मधील दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत संचालनालयाचे पत्र दि.२८.१०.२०१६ अन्वये कळविण्यात आले होते. (प्रत संलग्न) तथापि विषयांकित प्रकरणी आपल्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास अदयापही अप्राप्त आहे.

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास दि.१८.०२.२०२५ पूर्वी सादर करावयाचा असल्याने सदरहू अहवाल **आजच उलट टपाली** संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ईमेल आयडी सादर करावा.

आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठ व महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन संचालनालयास सादर करावा.

Signed by
Suyash Madhukar Dusane
Date: 17-02-2025 11:21:23
**(सुयश दुसाने)**
प्रशासन अधिकारी (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रत:- मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@ gov.in

क्रमांक:- न्यायाप्र-२०२५/प्र.क्र.०७/२०२५/समन्वय दिनांक:- १२.०२.२०२५

(न्यायालयीन प्राथम्य)

प्रति,

१. संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय - अवमान याचिका क्र. ३९०/२०१८, श्री. संतोष श्रीकृष्ण पाचलाग वि. महाराष्ट्र शासन (जनहित यांचिका क्र. १७३/२०१०, डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर) ध्वनी प्रदूषण(नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ - शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२२१२/(प्र.क्र.१३१/२०१६)/समन्वय, दि. २१.१०.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन परिपत्रकाचे अवलोकन करावे.

२. उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयामार्फत आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा, आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांबाबतचा अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

ई-मेल केले.
१२.०२.२०२५

आपली,

(स्वाक्षरी)
(गौरी रा. म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती (आस्था-२)

C:\Users\Sushilkumar.Shinde\Desktop\वरदा\आस्था-२\०१.०१.२०२४ पासून\०१.०१.२०२५ New\प्र.क्र. ०७-२४ अवमान याचिका क्र.३९०-२०१८ श्री. संतोष पचलाग -ध्वनी प्रदुषण.Docx

ध्वनी प्रदूषण ( नियमन व नियंत्रण ) नियम, २०००
च्या अंमलबजावणीबाबत.

शिक्षण ... महारा... ००५.
25 OCT 2016
आवक क्रमांक:- 24828
शाखा:- साप्र-9

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र-२२१२/(प्र.क्र.१३१/२०१६)/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०१६

वाचा :- १) पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्र.ध्वनीप्र २०००/प्र.क्र.२४/तां.क.३ (भाग-३), दि.०७.०४.२००३

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र.संकीर्ण १११११/(प्र.क्र.१५७/१५)/समन्वय, दि.०९.११.२०१५

परिपत्रक - ध्वनी प्रदुषण नियमांची अंमलबजावणीबाबत डॉ.महेश वेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र.१७३/२०१० दाखल केली होती. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दि.१०.०८.२०१६, दि.११.०८.२०१६, दि.१२.०८.२०१६ व दि.१६.०८.२०१६, रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद ९४ येथे दिलेले निर्देश खालीलप्रमाणे आहेत. :-

" As directed by the Apex Court, we direct the State Government to conduct public awareness programmes inviting attention to the members of the public to the Noise Pollution Rules and especially the adverse effects of the Noise pollution not only on the human beings but on all living beings. As directed by the Apex Court, the State Government shall issue necessary directions, for holding such public awareness programmes especially in schools and colleges throughout the State so that students are educated on the adverse impact of sound pollution. Such public awareness programmes shall be conducted by the State for the benefit of the members of the public by taking cooperation of television channels, social media, FM channels etc. Such awareness programmes for the benefit of the citizens shall be frequently conducted especially before commencement of major religious and cultural festivals. "

२. ध्वनी प्रदूषण ( नियमन व नियंत्रण ) नियम, २००० च्या नियम ५ च्या उपनियम ( ३ ) नुसार ध्वनी प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी ध्वनी प्रदुषणावर निर्बंध घालण्याच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार या विभागानेही सर्व संचालकांना सणांच्यावेळी मोठया आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणारा ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने या संदर्भात

दिलेल्या उपरोक्त निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत राज्यातील शैक्षणिक संस्थांना व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ध्वनी प्रदुषणाचे दुष्परिणांमाची माहिती प्रभावी माध्यमाचा वापर करुन कार्यक्रम आयोजित करण्याबाबत तसेच योग्य प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने उचित पाऊले उचलण्याबाबत या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संचालकांना सूचित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिद्धार्थ खरात )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१०.अवर सचिव ( वि.शा. १ ब ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी कल्याण मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. प्रभाकर देसाई**
एम्.ए., पीएच्.डी.
**संचालक**

संदर्भ क्र. विकमं/२०१६–१७/८२२ दिनांक : १४/१२/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

**विषय :– ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत...**

**संदर्भ क्र. :– शासन पत्र क्र. उशिसं/२०१६/ध्वनी प्रदूषण/मवि–१/१३९९४, दि. ०९/१२/२०१६,**
**शासन पत्र क्र. संकीर्ण – १०१६/प्र.क्र.१३१/२०१६/समन्वय, दि. ०५.१२.२०१६,**
**शासन पत्र क्र. न्यायाप्र–२२१२/(प्र.क्र.१३१/२०१६)/समन्वय, दि. २१.१०.२०१६,**
**संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०१६/ध्वनी प्रदूषण/मवि–१/१२४०१, दि.२८.१०.२०१६.**

महोदय/महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या नियम ५ च्या उपनियम (३) च्या नुसार ध्वनी प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी ध्वनी प्रदुषणावर निर्बंध घालण्याच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाने संदर्भ क्र. १ नुसार शासन निर्णयानुसार सूचना निर्गमित केल्या आहेत.

सदर बाबत आपल्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्था / सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागामध्ये प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मा. संचालनालयास त्वरित सादर करण्यात यावा, ही विनंती. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने विलंब करु नये अन्यथा होणाऱ्या विलंबास आपणास जबाबदार धरण्यात येईल.

कळावे,

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी कल्याण मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune .gov.in E-Mail : mavi.dhepune@gov..in
फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


Students' Welfare INWARD No. 2583 13 DEC 2016 Savitribai Phule Pune University

क्र.उशिसं/२०१६/ध्वनी प्रदूषण /मवि-१ /१३००४ दिनांक-०९/१२/२०१६
न्यायालयीन प्रकरण / तात्काळ

मा. कुलसचिव यांचे कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 5215 10/12/16 13/12/2016 विभाग - Dir BSW

प्रति,
१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.
२) विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

**विषय :- ध्वनी प्रदूषण ( नियमन व नियंत्रण ) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत.**
**संदर्भ :-१) शासन पत्र क्र.संकीर्ण १०१६/प्र.क्र.१३१/२०१६/समन्वय, दि.०५.१२.२०१६**
**२) शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२२१२/(प्र.क्र.१३१/२०१६)/समन्वय, दि.२१.१०.२०१६**
**३) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/२०१६/ध्वनी प्रदूषण /मवि-१/१२४०१, दि.२८.१०.२०१६**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकात दिलेल्या निर्देशानुसार मा. न्यायालयाने ध्वनी प्रदूषणाबाबत विविध माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्याचे तसेच नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ क्र.३ च्या संचालनालयाच्या पत्रान्वये सुचित करण्यात आलेले होते.

ध्वनी प्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत डॉ. महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या.क्र. १७३/२०१० दाखल करण्यात आलेली होती. यामध्ये मा. न्यायालयाने ध्वनी प्रदूषणाबाबत विविध माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्याचे तसेच नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश राज्य शासनाला दिलेले आहेत. संदर्भ क्र.३ अन्वये सदर विषयाबाबतची सुनावणी दि.१६.१२.२०१६ रोजी घेण्यात येणार असल्याने कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर बाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालयांनी प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास दि.१३.१२.२०१६ पूर्वी सादर करण्यात यावा. न्यायालयीन प्रकरण असल्याने विलंब करु नये अन्यथा होणाऱ्या विलंबास आपणास जबाबदार धरण्यात येईल.

(डॉ. वि. रा. मोरे )
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

सोबत-
संदर्भ क्र. १ ची प्रत

Dir. B.S.W.
10.12.16

प्रत-
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

१४

महाराष्ट्र शासन

क्र.न्यायाप्र-२२१२/प्र.क्र.१३१/२०१६/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०५ डिसेंबर, २०१६.

प्रति,

१) सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय ,मुंबई.
२) संचालक ( उच्च शिक्षण / ~~तंत्र शिक्षण~~ / ~~कला~~ / ~~ग्रंथालय~~ संचालनालय ), महाराष्ट्र राज्य, पुणे/~~मुंबई~~.
३) सर्व अकृषि विद्यापीठे

विषय :- ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण ) नियम, २००० बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :-१) शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र-२२१२/प्र.क्र.१३१/२०१६/समन्वय, दि.२१ ऑक्टोबर, २०१६.
२) या कार्यासनाचे समक्रमांकाचे दि.७.११.२०१६ चे पत्र.

महोदय /महोदया,

श्री.सुधीर श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अर्धशासकीय दि.३.१२.२०१६ चे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. उपरोक्त विषयावरील संदर्भिय परिपत्रकानुसार मा. उच्च न्यायालयाने ध्वनी प्रदुषणासंदर्भात दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत राज्यातील शैक्षणिक संस्थांना व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण व कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

३. मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर दाखल झाली आहे. सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाला शासनाकडून प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाही परिपूर्तीचा अहवाल अपेक्षित आहे. तथापि विविध विभागांकडून आलेल्या अहवालामध्ये सदर बाबींसंदर्भात स्वयंपूर्ण माहिती नसल्याने मा. उच्च न्यायालयात दि.२.१२.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा परिपूर्ण अहवालासह शपथपत्र दाखल करण्यासाठीच्या सूचना मा.न्यायालयाने दिलेल्या आहेत. त्यानुसार पुढील सुनावणी दि.१६.१२.२०१६ रोजी ठेवण्यात आली आहे. तरी याबाबत महाविद्यालयामध्ये तसेच क्षेत्रीय स्तरावर प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.८.१२.२०१६ रोजी पर्यंत शासनास उपलबध करुन देण्यात यावा. यावेळेत माहिती प्राप्त न झाल्यास आपली माहिती निरंक समजून तसे गृह विभागास कळविण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. तेव्हा आपल्याशी संबंधित माहिती विहित वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

( रा. वि. जाधव )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

अ.शा.प.क्र.डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब
गृह विभाग, दुसरा मजला,
मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ३२.
दिनांक : ०३.१२.२०१६.

महाराष्ट्र शासन

सुधीर श्रीवास्तव
अपर मुख्य सचिव (गृह)

विषय :- जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०.
डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर.
(ध्वनी प्रदुषण नियमांची अंमलबजावणीबाबत.)

मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर दाखल झाली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने Noise pollution (Regulation & Control) Rules, २०१० च्या अंमलबजावणीबाबत दिनांक १०/११/१२ व १६.०८.२०१६ आणि दिनांक २६.१०.२०१६ रोजी विविध निदेश दिलेले आहेत. तसेच दिनांक २६.१०.२०१६ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये न्यायालयाने दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबद्दल मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९.११.२०१६ पर्यंत शपथपत्र दाखल करण्याबाबत आदेश दिले होते.

सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाला शासनाकडून प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाही परिपूर्तीचा अहवाल अपेक्षित आहे. तथापि विविध विभागांकडून आलेल्या अहवालामध्ये सदर बाबींसंदर्भात स्वयंपूर्ण माहिती नसल्याने मा. उच्च न्यायालयात दिनांक ०२.१२.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा परिपूर्ण अहवालासह शपथपत्र दाखल करण्यासाठीच्या सूचना मा. न्यायालयाने दिलेल्या आहेत. त्यानुसार पुढील सुनावणी दिनांक १६.१२.२०१६ रोजी ठेवण्यात आली आहे. सदरहू आदेशाच्या प्रत प्राप्त होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रत्यक्ष केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल न्यायालयास अपेक्षित असल्याचे सुनावणीच्या वेळी सांगितले. तरी मा. न्यायालयीन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आपण कृपया व्यक्तीश: लक्ष देऊन आपल्या विभागाशी संबंधित मुद्यांबाबत प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीची माहिती दिनांक १०.१२.२०१६ पूर्वी पाठविण्याची व्यवस्था करावी.

( सुधीर श्रीवास्तव )

प्रति,

श्री. एस. जे. कुंटे,
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.